नियमित दिवाणी दावा क्र.१३/२०२०
सय्यद कमरोद्दीन व इतर वि. सय्यद सलीम व इतर
सिएनआरक्र.एमएचजेएन०८०००००८६२०२०

## निशाणी क्रमांक ३७ खाली आदेश
**(दि.१४.०७.२०२२)**

प्रस्तुतचा अर्ज वादींनी मयत प्रतिवादी क्र.३ चे वारस अभिलेखावर घेण्यात यावे, याकरीता केला आहे.

२) अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादींनी कथन केले की, प्रतिवादी क्र.०३ दि.१२.०२.२०२२ रोजी मयत झाला व अर्जात नमुद वारस बरोबर आहेत. दोन्ही पक्षकारांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

३) वादींनी असे कथन केले की, प्रतिवादी क्र.३ सय्यद बिस्मिल्ला सय्यद मिर्झा हे दि.१२.०२.२०२२ रोजी मयत झाले आहे. त्यामुळे त्यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र.३ चे वारस जर अभिलेखावर घेतले नाही तर, वादींचे न भरून येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

४) अर्जाचे अवलोकन केले असता, असे स्पष्ट होत आहे की, मयत प्रतिवादी क्र.३ हे दि.१२.०२.२०२२ रोजी मयत झालेले आहे. निशाणी क्र.३६ च्या कागदपत्रांच्या यादीसोबत मयत प्रतिवादी क्र.३ चे मृत्यु प्रमाणपत्राची प्रत देखील दाखल आहे. त्यामुळे वादीने केलेल्या कथनास पुष्टी मिळते.

५) प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादींविरूध्द कायमचा मनाई हुकूम मिळावा, याकरीता दाखल केलेला आहे. अशास्थितीमध्ये मयत प्रतिवादी क्र.३ चे वारस

अभिलेखावर असणे आवश्यक आहे. मयत प्रतिवादी क्र.३ हा दि.१२.०२.२०२२ रोजी मयत झालेला आहे व प्रस्तुतचा अर्ज दि.१६.०४.२०२२ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. वारस अभिलेखावर घेण्याकरीता अर्ज मुदतीत दाखल केला आहे. अर्ज मंजुर करण्यात आला तर प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

**आदेश**

१) अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) वादींनी पुढील तारखेपर्यंत मयत प्रतिवादी क्र.३ चे वारस अभिलेखावर घ्यावे.

३) मयत प्रतिवादी क्र.३ चे वारस अभिलेखावर घेतल्यानंतर त्यांना दाव्याचे समन्स व मनाई हुकूम अर्जाच्या नोटीस पाठविण्यात याव्या.

४) अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SACHIN BHAGVAT SHIRSATH
Date: 2022.07.14 16:32:59 +0530

**(स. भा. शिरसाठ)**

दिनांक : १४/०७/२०२२

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
घनसावंगी.